**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री जीवदानी देवी संस्थान, विरार सार्वजनिक नोंदणी क्रमांक ए / ३९७, श्री जीवदानी मार्ग, विरार (पूर्व), तालुका-वसई, जिल्हा - पालघर- ४०१ ३०५, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित फ्युनिक्युलर सिस्टिमवर आधारित जीवदानी पॅसेंजर (रोपवे) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्तांत**

**संदर्भ :-** १) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार

२) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या सागरी तटीय विनियमन अधिसुचना दिनांक ०६-०१-२०११ अनुसार

३) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक १४-०९-२०२० चे निर्देश.

४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे क्रं.बी-२००९१७-एफटीएस-००८२, दिनांक १७-०९-२०२० चे निर्देश.

-------------

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री जीवदानी देवी संस्थान, विरार सार्वजनिक नोंदणी क्रमांक ए / ३९७, श्री जीवदानी मार्ग, विरार (पूर्व), जिल्हा - पालघर- ४०१ ३०५, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित फ्युनिक्युलर सिस्टिमवर आधारित जीवदानी पॅसेंजर (रोपवे) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता श्री जीवदानी देवी संस्थान, जीवदानी देवी मंगल कार्यालय, तिसरा मजला, जीवदानी मंदिर रस्ता, विरार (पूर्व), विरार, तालुका-वसई, जिल्हा-पालघर - ४०१ ३०५, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ आणि १४-०९-२०२० (संदर्भ १ व ३ वरिल प्रमाणे) अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-७३, द्वारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२०१२०३-एफटीएस-०१३१ दिनांक ०३ डिसेंबर, २०२० अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

**२)** प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, ठाणे-२ - **समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
ठाणे

श्री ईश्वर ठाकरे, उप प्रादेशिक अधिकारी, , ठाणे-२, मप्रनि मंडळ, ठाणे तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली (संदर्भ क्रं. १ व ३ वरिलप्रमाणे) व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई (संदर्भ क्रं. ४ वरिलप्रमाणे) दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष जनसुनावणी (Virtual Public Hearing) आयोजित करण्यात आलेली असून बैठकीच्या सत्रात १०० व्यक्तींना परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास राहिलेल्या व्यक्तींना पुढील सत्रात बैठकीत संधी देण्यात येईल. सर्व उपस्थितांना जनसुनावणीत सहभागाची संधी देण्यात येईल असे सांगितले. त्यांनी

उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर सभागृहात प्रवेश करताना करण्यात आलेला आहे. बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

समन्वयक यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिति यांनी असे सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री ईश्वर ठाकरे यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री जीवदानी देवी संस्थान, विरार सार्वजनिक नोंदणी क्रमांक ए / ३९७, श्री जीवदानी मार्ग, विरार (पूर्व), तालुका-वसई, जिल्हा - पालघर- ४०१ ३०५, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित फ्युनिक्युलर सिस्टिमवर आधारित जीवदानी पॅसेंजर (रोपवे) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग अ-७ (जी) मध्ये मोडत असून वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ अन्वये अधिसुचित तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्य पासून ४.४ कि.मी. (पूर्व) आणि अधिसुचित पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) २.५ कि.मी. अंतरावर असल्याने त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस

प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या पर्यावरण व्यवस्थापन योजना / प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने ४५ व्या बैठकीत प्रस्ताव ठेऊन दिनांक ०३-१२-२०१९ रोजी त्यास मान्यता (अटी व शर्ती - Terms of Reference) देण्यात आली.

सदरहू जनसुनावणी ही दिनांक ३०-१२-२०२० रोजी आयोजित करण्यात आलेली असल्याने त्यानुसार पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय- पालघर यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २६-११-२०२० रोजी पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती.

त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे, उप प्रादेशिक अधिकारी, ठाणे-२, महाराष्ट्र

प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे व मप्रनि मंडळाच्या www.mpcb.gov.in संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

समन्वयक यांनी असे सांगितले की, स्थानिक म.प्र.नि. मंडळ ठाणे कार्यालयास ०१ लेखी आक्षेप व प्रकल्पास पाठिंबा असलेले -२६ लेखी निवेदन प्राप्त झालेली असून संबंधितांना सुनावणीच्या वेळी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. श्री. ईश्वर ठाकरे यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्ह्यातील मांढरदेवी देवस्थानातील गर्दीमुळे झालेल्या दुर्घटनेनंतर महाराष्ट्र शासनाने डोंगरावरील सर्व धार्मिक स्थळांसाठी जारी केलेले आदेशांबाबत माहिती दिली.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जीवदानी मंदिर हे महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील विरार येथील एक टेकडीवर स्थित मंदिर आहे. मंदिराच्या आसपासचा परिसर नयनरम्य असून सुट्टीच्या व सणाच्या दिवशी मोठ्या संख्येने भाविक येतात. मंदिरात जाण्यासाठी जीवदानी डोंगरावरुन ९०० पाय-या चढून जावे लागत असल्याने भाविकांसाठी मंदिरातील प्रवास हा कठिण आहे. श्री जीवदानी देवी संस्थानने भाविकांना डोंगरावर चढण्यासाठी वाहतुकीची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी विविध पर्यायांचा अभ्यास केला व फ्युनिक्युलर सिस्टिमचा एक उत्तम पर्याय मानला.

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा भाविकांच्या सोयीसाठी विकसित करण्यात येत आहे.

सादरी करणानंतर पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिति यांनी उपस्थितांना त्यांच्या काही आक्षेप, सूचना नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

१) <u>श्रीमती माया चौधरी, राहणार-विरार, तालुका - वसई, जिल्हा-पालघरः-</u>

श्रीमती माया चौधरी यांनी सांगितले की, ज्यांनी सादरीकरण केले त्यांचे आभार मानते. कारण सामान्य माणसांना बरेच मुद्दे लक्षात येत नाहीत व याबाबत अभ्यास कसा करावा लागतो हे माहित नसते. येथे जमिनीची क्षमता, पाण्याची स्थिती या सर्वांचा अभ्यास केलेला आहे. आम्ही बरीच वर्षे येथे राहतो. हा डोंगराळ परिसर हा संपूर्णपणे ओसाड होता. मात्र या श्री जीवदानी देवी ट्रस्टने याचा पूर्णपणे काया-पालट केलेला आहे. ओसाड डोंगर व आता झालेला हिरवागार डोंगर आम्ही पहात आहोत. दरवर्षी ३०-३५ लाख रुपये खर्च करुन वनीकरण केले जाते. यातील फरक आम्ही पहात आहोत. आमच्या बचत गटातर्फेही या वनीकरणासाठी दरवर्षी सहभाग घेतला जातो. वनीकरण करताना त्यावेळी आम्ही डोंगरावरुन खाली येत असताना पाहण्यात येते की पावसाच्या पाण्याची साठवण (Rain Water Harvesting) व पाणी अडवण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे लावण्यात आलेली झाडे जोमाने वाढतील.

त्यांनी पुढे सांगितले की येथे देवीच्या दर्शनासाठी अनेक भाविकांची अमाप गर्दी लोटलेली असते. त्यामुळे ब-याच वेळा खाण्याचे पदार्थ व प्लॅस्टिकची वेष्टने ही डोंगरावर टाकली जातात. फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) मुळे या गोष्टी निश्चितच टाळू शकतील व डोंगरावरील प्लॅस्टिकचे प्रदूषण टाळता येईल.

त्याचप्रमाणे समाजात अशाही काही व्यक्ती असतात, त्यांना उंचीचा फोबिया असतो. फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) मुळे त्यांना दर्शनास जाता येईल. त्या म्हणाल्या की मी सामाजिक कार्यात आहे. त्यामुळे मला माहिती आहे की या ट्रस्टतर्फे कोरोनाच्या संकटाच्या काळात

अव्ह्यातपणे कित्येक हजारो गरजू लोकांना अन्नदान दिलेले असून ते चालू आहे. असे बरेच मुद्दे आहेत. या प्रकल्पामुळे सर्वांनाच फायदा होईल. तरी संबंधित फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) ला आमचा पाठिंबा आहे.

२) **<u>श्री हार्दिक र. राऊत, राहणार-विरार, तालुका-वसई, जिल्हा-पालघर :-</u>**

माझे जन्मगाव विरार आहे. मी लहानपणा पासून या ट्रस्टने केलेला विकास पहात आहे. मी लहान असताना या डोंगरावर एकही झाड दिसत नव्हते, आता हिरवा डोंगर दिसत आहे. या जीवदानी ट्रस्टच्या माध्यमातून व महानगर पालिकेच्या माध्यामातून परिसरातील विकास पहात आहे. जसे माझे वय वाढत आहे, त्याप्रमाणे येथे झाडे वाढताना पहात आहे. माझे आता वय ३५ वर्षांचे आहे. मला समजायला लागल्यापासून मी येथे झाडे बघत आहे. आमचा सकाळचा ग्रुप (मॉर्निंग ग्रुप) आहे. आम्ही सकाळी येथे येतो. येथे येण्याने आनंद मिळतो, त्याचवेळेस गर्दीही बरीच असते. त्यांना चांगल्याप्रकारे दर्शन मिळणे गरजेचे आहे.

तरी फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) मुळे ब-याच लोकांना दर्शन योग्यप्रकारे मिळू शकेल. कारण देवीच्या दर्शनास फक्त विरारचे नाही, तर महाराष्ट्रातील व देशातील लोक येत असतात. भाविकांचे वेळेचा सदुपयोग (टाईम मॅनेजमेंट) होणे महत्वाचे आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे जीवदानी ट्रस्टमुळे येथील स्थानिक व आजूबाजूच्या खूप लोकांना विविध व्यवसाय करण्यास मिळतो. ते चहावाले, फुलवाले, रिक्षा व्यवसाय करणारे असतील त्यांना उदर निर्वाहाचे साधन मिळाले आहे. विरार व आजूबाजूस पुजेच्या साहित्याची दुकाने असतील त्यांचा व्यवसाय वाढेल. नारळाच्या वड्या प्रसाद म्हणून विकणारे सर्वजण हे स्थानिक आहेत. त्यांना रोजगार मिळालेले आहेत. जीवदानी ट्रस्ट नैसर्गिक आपत्तीमध्येही मदत करण्यास पुढे असतो. आता कोरोनाच्या संकटाच्या काळातही गेले ७-८ महिने गरजूंना भरपूर अन्नदान

जीवदानी ट्रस्टने केलेले आहे. असे दुसरीक़डे कुठेही झालेले नसेल. प्रत्येक सामाजिक कार्यात जीवदानी ट्रस्ट पुढे असतो.

तरी जास्तीत जास्त लोकांना चांगल्याप्रकारे दर्शन होण्यासाठी येथे फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) ची आवश्यकता असून आमचा फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) बांधण्यास पाठिंबा आहे. उपस्थितांनी टाळया वाजवून पाठिंबा दर्शविला.

**३) ॲडव्होकेट रमाकांत वाघतौडे, राहणार-नालासोपारा, जिल्हा-पालघरः-**

त्यांनी प्रथम जनसुनावणी आयोजित केल्याबद्दल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास धन्यवाद दिले. ते म्हणाले की, जरी मी सातारा जिल्हयातील असलो, तरी गेले अनेक वर्षे मी येथेच राहत असून जीवदानी देवी ट्रस्टचे काम जवळून बघितले आहे. मी इतर विविध धार्मिक संस्थांचे काम बघितले असून या जीवदानी देवी ट्रस्टचे काम उल्लेखनीय व उजवे आहे. या संस्थेने इतरांना आदर्श घालून दिलेला आहे. जरी ही संस्था धार्मिक असली, तरी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक, इतर सामाजिक उपक्रमात या संस्थेचा सहभाग हा अग्रणी आहे. या संस्थेने गोरगरिबांसाठी व विशेषतः नैसर्गिक संकट, पूर, महापूर यावेळेस राबवविलेले उपक्रम, मदत हे जीवदानी देवी संस्थेने शासनासारखे काम केलेले आहे, लाखो गोरगरिबांना मदतीचा हात दिलेला आहे. जिल्हयातल्या अनेक लोकांचा त्यांनी विश्वास कमवलेला आहे. आम्ही येथे समर्थनासाठी आलेलो आहोत, आम्ही समर्थक आहोत. या फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) चा कित्येक लोकांना फायदाच होणार आहे. समाजातील दिव्यांग व वरिष्ठ नागरिकांना या फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) चा फायदा होणार आहे. तरी मी

नालासोपा-यातील जनतेतर्फे व सर्व नागरिकांतर्फे या प्रकल्पास पाठिंबा देतो. हा विकासाचा मार्ग आहे. येथेही एखादी व्यक्ती वा अनेकजण नैराश्यातून वा विशिष्ट कारणांमुळे प्रेरित होऊन या प्रकल्पाबाबत काही हरकत घेत असतील, तर माननीय जिल्हाधिकारी तथा

जिल्हादंडाधिकारी व मप्रनि मंडळ अधिकारी यांनी याबाबत गांभीर्याने लक्ष दयावे व हा प्रगतीचा मार्ग असल्याने यास मान्यता दयावी. प्रकल्पास त्यांनी पाठिंबा दर्शविला.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी पाठिंब्याबद्दल धन्यवाद दिले.

**४) <u>ॲडव्होकेट एन. जैन, राहणार-विरार, तालुका - वसई, जिल्हा-पालघरः-</u>**

श्री जैन यांनी सांगितले की, येथे सर्वजण सुंदर अशा फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) च्या समर्थनार्थ आलेले आहेत. येथे जे लोक येऊ शकले नाहीत, त्यांचेही या प्रकल्पास समर्थन आहे. आमचे संपुर्ण समर्थन विरार गावाच्या विकासासाठी आहे. सदरहू प्रकल्पाची विरार गावाच्या विकासासाठी गरज असून आम्ही कल्पानाही करु शकत नव्हतो की आम्हांला जीवदानी मातेचे तीन मिनिटात जाऊन दर्शन घेता येणार आहे. सादरीकरणात ही सुंदर कल्पना छान सांगितली. तरी मी शासनास विनंती करतो की आपण मंजूरीसाठी गांभीर्याने विचार करावा. या प्रकल्पाने निसर्गावर काहीही दुष्परिणाम होणार नाही. स्थानिकांना रोजगार मिळेल व विरार गावाचे नांव हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्थरावर जाईल. मी प्रदूषण नियंत्रण मंडळास पुन्हा विनंती करतो की, त्यांनी सदरहू प्रकल्पाविषयी गांभीर्याने विचार करावा व लवकरात लवकर या प्रकल्पाचे काम सुरु करण्यात यावे. आम्ही सर्वजण प्रकल्पाचे समर्थन करतो व अजून हजोरो लोक समर्थनास तयार आहेत.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी समर्थन केल्याबद्दल धन्यवाद दिले.

**५) <u>श्रीमती स्वाती मराठे, राहणार-विरार, तालुका - वसई, जिल्हा-पालघरः-</u>**

श्रीमती मराठे यांनी सांगितले की त्या शिक्षिका आहेत. त्यांनी सांगितले की लहानपणा पासून त्या विरारला राहत असून सदरहू प्रकल्पामुळे विरारच्या विकासास मदत होईल. आम्ही शाळेतील लहान

मुलांना सहलीसाठी आणतो. लहान मुलांना व वृध्द माणसांना फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) मुळे फायदा होऊ शकतो. स्थानिकांना रोजगार मिळू शकतो. त्याचप्रमाणे जीवदानी देवी संस्थेने झाडे लावली आहेत. दर्शनासाठी मुंबईहूनही लोक येतात. त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळतो. येथे उपस्थितांनी सूचना केलेली आहे की हा प्रकल्प लवकरात लवकर सुरु करण्यात यावा.

६) **<u>श्री सुनील बजाज, राहणार-विरार, तालुका-वसई, जिल्हा-पालघरः-</u>**

श्री सुनील बजाज यांनी सांगितले सदरहू प्रकल्प हा सामान्य जनतेच्या सोयीसाठी असल्याने मी जरी पाठिंबा देत असलो, तरीही सदरहू प्रकल्प ज्या पध्दतीने मंजूर करण्यात आला व ज्या परिस्थितीत म्हणजे कोविडच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आली, त्याबाबत माझी हरकत असून, मी त्याबाबत लेखी हरकत नोंदविली आहे.

७) **<u>श्री जय देसाई, राहणार-विरार, तालुका - वसई, जिल्हा-पालघरः-</u>**

माझे नांव जय देसाई असून, मी एम.बी.ए. करत आहे. मी युवा-विद्यार्थी आहे. हा जो फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) प्रकल्प आहे. त्या विषयी एक विद्यार्थी व युवक म्हणून मी माझे मत मांडतो की आमचा या जीवदानी देवी ट्रस्टवर एवढा विश्वास आहे की नवरात्रात येथे लाखो लोक येतात. जर रोपवेमुळे पाय-यांशिवाय जर एकावेळी शंभरपेक्षा जास्त लोक दर्शनास जात असतील, ते जनतेच्या खूपच सोईचे होणार आहे. आपणा सर्वांनाच माहित आहे की कोविडच्या प्रादुर्भावामुळे पर्यटन उद्योग हा अडचणीत आलेला आहे. ह्या रोपवेमुळे विरारला पर्यटकांचे जाणे-येणे वाढेल. वसई-विरारचा विचार केल्यास येथे बरेच समुद्रकिनारे आहेत. त्यामुळे स्थानिकांच्या पर्यटनात व उत्पन्नात वाढ होईल. खूप चांगली गोष्ट मंदिराच्या ट्रस्टने केली आहे. मी लहानपणापासून मंदिरात येतो, तर माझे आजोबा ९० वर्षांचे होईपर्यंत मंदिरात रोज येत असत. ह्या प्रकल्पाच्या अभ्यासासाठी बरेच अभियांत्रिकी विद्यार्थी येऊ शकतात.

तरी लोकांच्या सोयीसाठी सदरहू प्रकल्प लवकारात लवकर सुरु व्हावा. आमचे प्रकल्पास समर्थन आहे. त्यासाठी त्यास मंजूरी त्वरित देण्यात यावी व लोकांची सोय बघावी.

८) **श्री जगदीश तरे, सफाळे स्टेशनपासून समुद्रकिनारी गाव आहे.**

श्री जगदीश तरे यांनी सांगितले की आमच्या गावात कोळी लोकांची वस्ती आहे. कोळी समाजाची अफाट श्रध्दा या देवीवर आहे. मी लहानपणा पासून या देवीच्या दर्शनासाठी येतो. देवीच्या नावाने नारळ फोडल्याशिवाय आमची बोट समुद्रात सोडली जात नाही व समुद्रातून आम्हांस या देवीचे देऊळ दिसते. आमची अपार श्रध्दा या देवीवर आहे. मी लहानपणा पासून हे मंदिर बघत आहे.

श्री जगदीश तरे यांनी सांगितले की जीवदानी देवी ट्रस्टने जो विकास केलेला आहे, तो खरोखरच वाखाणण्यासारखा आहे. डोंगरावरुन देवी आशीर्वाद देत आहे अशी श्रध्दा आहे. कोरोना संकट काळात जीवदानी देवी संस्थेचे पदाधिकारी सतत लोकांची सेवा करत होते. ज्या ठिकाणी अन्न मिळत नव्हते, तेथे जाऊन अन्नदानाची व्यवस्था करत होते. जीवदानी देवी संस्थेला आमच्या कोळ्यांचा मानाचा मुजरा. आज माणसाला गरज आहे माणसाची. ही जीवदानी देवी संस्था ही माणुसकी जपत आहे. प्रकल्पास शुभेच्छा.

९) **श्री नरेश जाधव, राहणार-नालासोपारा, जिल्हा-पालघर-**

आज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे आभार मानतो की आपण पर्यावरण माध्यमातून एकत्र जमलो आहोत. मी गेले ३५ वर्षे येथे राहत असून मला येथील सर्व माहिती आहे. हे डोंगर जे हिरवेगार दिसत आहेत, त्याचे श्रेय भिवंडी महानगर पालिका, वसई-विरार महानगर पालिका व जीवदानी देवी संस्थेस आहे. महानगर पालिकेच्या माध्यमातून १-२ कोटी झाडे परिसरात लावलेली आहेत. येथे हजारो वर्षांचा इतिहास आहे की ही जीवदानी देवी पुरातन असून अनेक लोक फक्त वसई, विरार, नालासोपाराचे नव्हे तर महाराष्ट्र व महाराष्ट्र बाहेरील लोक दर्शनास येत आहेत. त्यांची भावना,

आत्मियता कायम राहिल असे काम जीवदानी देवी संस्थानने केलेले आहे. या कोविडच्या महामारीच्या काळात जीवदानी देवी ट्रस्टने जवळजवळ ७० लाख लोकांना जेवण दिलेले आहे. हे महान कार्य संपूर्ण भारत देशात नावाजेल असे आहे. तरी लोकांच्या भावनांचा विचार करुन जीवदाना देवी ट्रस्टच्या फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) स मान्यता देण्यात यावी.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पास पाठिंबा दिल्याबद्दल धन्यवाद दिले.

१०) **श्री संदीप सखाराम नाडकर, साईनाथ नगर, विरार, तालुका - वसई, जिल्हा-पालघरः-**

आपल्याला हिरवेगार डोंगर दिसत आहेत. याचे सर्व श्रेय जीवदानी देवी संस्थेस जाते. त्याचप्रमाणे कोविडच्या काळात पाणी व जेवण पुरविण्यापासून ची मदत सर्व समाजात केलेली आहे. आज फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) उभारणीसाठी ही जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून त्यामुळे भाविकांची सोय होईल व येथील रिक्षावाले, फुलवाले यांनाही रोजगार मिळेल. तरी माझी छोटीशी विनंती आहे की या प्रकल्पास लवकरात लवकर मंजूरी देण्यात यावी.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी धन्यवाद व्यक्त केले.

११) **श्री धनंजय झा, राहणार-विरार, तालुका- वसई, जिल्हा-पालघरः-**

मी येथे २२ वर्षे राहत आहे. मी बिहारचा असून नोकरी धंद्यासाठी येथे आलो. येथील मी सर्वांचा रिवाज पाहिला की येथे जे येतात, ते प्रथम जीवदानी देवीच्या दर्शनास येतात. मी २२ वर्षांपूर्वी पाहिलेले मातेचे मंदिर व पहाड व आता यात खूपच परिवर्तन झालेले आहे. हे परिवर्तन एका दिवसात झालेले नाही, तर गेले २०-२५ वर्षे सतत प्रयत्न केल्याने झालेले आहे. याबद्दल जीवदानी देवी ट्रस्टला धन्यवाद. येथे ५-७ लाख लोक छोट्या छोट्या घरात राहत होते, ते

आता स्वतःच्या फ्लॅटमध्ये राहण्यास गेलेले आहेत. ही सर्व जीवदानी मातेची कृपा आहे. जीवदानी देवी संस्थेचे सामाजिक कार्य हे येथे राहण्यासाठी मदत करते. आमचा या जीवदानी देवी ट्रस्टवर पूर्ण विश्वास आहे.

त्यांनी सुंदर सादरीकरण केल्याबद्दल पर्यावरण सल्लागार यांचे आभार मानले. त्यांनी विचार मांडले की हे स्थान महाराष्ट्र राज्यात सर्वांना माहित आहे, पण सदरहू योजनेनंतर ते देशव्यापी होईल. ज्याप्रमाणे माता वैष्णोदेवी स्थानावर जातात, त्याप्रमाणे येथेही संपूर्ण भारत देशातील लोक दर्शनास येतील. मी येथे जीवदानी देवी ट्रस्टला त्यांना हाती घेतलेल्या फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) योजनेबद्दल धन्यवाद देतो. या योजनामुळे भाविकांना दर्शन रांगेत उभे राहण्याचा वेळ वाचेल. त्याचप्रमाणे ट्रस्टचे धन्यवाद देतो की ज्यावेळी कोरोना महामारीच्यावेळी लोक अन्न मिळत नसल्याने गावी पायी जात होते, पण विरारपासून पायी जाण्यास कोणीही मजबूर झाले नाही, कारण ट्रस्टने केलेले अन्नदान, औषधोपचार व सुरक्षितता. तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास विनंती आहे की आपण सदरहू रोपवे योजना त्वरित मंजूर करावी.

पर्यावरण सल्लागार यांनी पाठिंबा दिल्याबद्दल धन्यवाद दिले.

१२) **<u>श्री शिरीष कृष्णा राऊत, राहणार-विरार,तालुका-वसई, जिल्हा-पालघरः-</u>**

गेले ६० वर्षे येथे राहत आहे. मी लहानपणापासून हा डोंगर पहात आहे. हा संपूर्ण ओसाड होता. रस्त्यावरही काही नव्हते. वरिल मंदिरात जायला उंच रस्ता होता. लोक घसरुन पडायचे. आता हा हिरवागार डोंगर झाला तो फक्त जीवदानी देवी ट्रस्ट व महानगर पालिकेच्या माध्यमातून झालेली आहे. या फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) योजनेमुळे पंचक्रोशीतील सर्व लोकांचा फायदाच होणार आहे. त्यामुळे वेळ, त्रास व पैसा वाचणार आहे. या फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) मुळे पर्यावरणाची हानी होणार नाही, धूर उत्पन्न होणार नाही.

येथील सर्व उपस्थित वक्त्यांनी मुद्दे अगोदरच सांगितलेले आहे. तरी मी जनसुनावणी समितीस विनंती करतो की त्यांनी सदरहू योजनेस मान्यता द्यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी धन्यवाद व्यक्त केले.

१३) **<u>श्रीमती कांचन झा, समाजसेविका, राहणार-विरार, तालुका - वसई, जिल्हा-पालघरः-</u>**

श्रीमती कांचन झा यांनी सांगितले की महाराष्ट्रात बरेच लोक हे सांस्कृतिक विचार, संबंधांनी एकमेकांसोबत जोडलेले आहेत. खूप लोक मातेचे व्रत करतात. जशी मुंबईच्या लोकांना मुंबादेवी आहे, त्याप्रमाणे ही आमची जीवदानी देवी आहे. फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) मुळे समाजातील सर्वांची सोय होईल. त्याचप्रमाणे येथे अगोदर उपस्थित केलेल्या विचारांनुसार येथे पर्यटन क्षेत्रास प्रचंड वाव मिळेल. रोप-वे मुळे लहान मुलांनाही सुरक्षितता पाळून दर्शन घेता येईल. तरी आपल्या सांस्कृतीक परंपरेस त्यामुळे प्रोत्साहन मिळेल. सदरहू प्रकल्पास आमचा पाठिंबा आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी धन्यवाद व्यक्त केले.

१४) **<u>श्री विवेक मदन पाटील, राहणार-सोपारा गाव, जिल्हा-पालघरः-</u>**

मी येथील स्थानिक आहे. आम्ही लहानपणापासून दर्शनास येत होतो. तारुण्यात पायी व आताही पायी दर्शनास जातो, पण आता वय वाढल्याने आमच्या सारख्या मध्यमवयीन लोकांना या फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) ची खूपच आवश्यकता आहे.

दुसरी गोष्ट पर्यावरणाची. तर माझ्या माहितीप्रमाणे ही फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) सौर उर्जेवर चालणार आहे. त्याचप्रमाणे वीजेवर चालणार असल्याने कोणतेही प्रदूषण होणार नाही. या प्रकल्पामुळे लोकांची सोय होणार आहे. पायी दर्शनास जाताना २-३ ठिकाणी लोक थांबतात. त्यावेळी जवळील बिस्किटे लोक खाऊन प्लॅस्टिक वेष्टन, प्लॅस्टिकची पाण्याची बाटली तेथेच

टाकतात. रोप-वेमुळे या प्रदूषण करणारे घटक/गोष्टी टाळल्या जातील व वेळेची खूपच बचत होणार आहे. हे माझे निरिक्षण आहे. या जीवदानी देवी ट्रस्टबाबत बोलायचे झाले तर महाराष्ट्रातल्या व भारतातल्या ट्रस्टने याचे अनुकरण करावे असा हा ट्रस्ट आहे. मग ते सामाजिक, शैक्षणिक, वैदकीय व आपत्कालिन मदत असेल, हा ट्रस्ट पुढे असतो. माझे असे निरिक्षण आहे की गडावर माकडांचे प्रमाण वाढलेले आहे. ते निसर्ग संवर्धन जपल्याचे लक्षण आहे असे मानतात.

पर्यावरण सल्लागार यांनी धन्यवाद व्यक्त केले.

१५) **श्री चंद्रकांत शंकर कातारे, राहणार-विरार, तालुका-वसई, जिल्हा-पालघरः-**

मी २०११ ला निवृत्त झालो व आता या डोंगरावर मी काम करत आहे. गेले वर्षांपासून मी जीवदानी देवी संस्थेसाठी पर्यावरण प्रेमी म्हणून योगदान देत आहे. गेले वर्षभर मी फ्युनिक्युलर सिस्टमच्या आसपास काम करत आहे. त्याच्या ६० मीटर्स दोन्ही बाजूला हजारो झाडांची लागवड केलेली आहे. तेथे दोन टप्प्यात पाण्याची फोगिंग व ठिबक योजना केलेली आहे. हा प्रकल्प सर्वांनाच आनंदाची पर्वणी ठरणार आहे. या प्रकल्पामुळे सर्वांनाच म्हणजे वयोवृध्द, आप्त, लेकीसुना, लहान बालके या सर्वांना मातेच्या दर्शनाचा लाभ होणार आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, त्यांनी लेखी निवेदन सादर करत असून त्यातील महत्वाचे मुद्दे वाचून दाखविले.

अ) हजारो भाविकांसाठी ट्रस्टचा प्रसाद स्वयंपाक गृहात केला जातो. तेथे निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी घरगुती सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा (एसटीपी) उभारण्यात आलेली असून प्रक्रिया केल्यावर सांडपाण्याचा पुनर्वापर टॉयलेट व हरितपट्टा विकसनासाठी/झाडांसाठी वापरला जातो.

ब) कोरोना काळात ट्रस्टचे काम अगदी जवळून पाहिले आहे. ट्रस्टने जवळजवळ २५ लाखाहून जास्त लोकांसाठी तयार अन्न पुरविले आहे. संपूर्ण तालुका हा ट्रस्टचा कुणी आहे असे मला व्यक्तिशः वाटते.

क) मी ५० वर्षांपेक्षा जास्त जीवदानी देवीच्या पायथ्याशी राहतो. मी जीवदानी देवीवर २००१ साली जीवदानी गाथा हे पुस्तक लिहिले. ते मराठी व हिंदीत आहे. तेव्हा मी लिहिले होते की गडावर जेव्हा पशुबळी बंद होईल, तो सुवर्ण दिन असेल. आता ट्रस्टने बलिदानावर बंदी घातलेली आहे.

ड) जीवदानी गड हा काळ्या पाषाणाचा आहे. त्यावर झाड जगविणे म्हणजे मोठे कठिण आव्हान आहे. मात्र अति कष्टाने ती झाडे जगवली आहेत.

धन्यवाद.

पर्यावरण सल्लागार यांनीही त्यांच्या पाठिंब्यास धन्यवाद दिले.

१६) **श्री अनुप्रासिंग, राहणार-विरार, तालुका -वसई, जिल्हा-पालघरः-**

मी उत्तरप्रदेशचा असून गेली १७ वर्षे विरारमध्ये राहतो. दर मंगळवारी जीवदानी मंदिरात माझे दर्शनासाठी येणे असते. आज येथे पर्यावरण विषयक जनसुनावणी असून ही ट्रस्ट पर्यावरण विषयक किती चांगले काम करतो याची मी २-३ उदाहरणे देतो-

**अ)** पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी ट्रस्टतर्फे झाडे लावण्यात येत आहेत. संपूर्ण जंगल विभाग व लावलेल्या झाडांचे संवर्धन व संरक्षण ट्रस्टतर्फे करण्यात येते.

**ब)** ट्रस्टने गडावर उत्तमरित्या प्लॅस्टिकवर बंदी घातलेली आहे. तरी सदरहू प्रल्कपास आमचा पाठिंबा आहे.

१७) **<u>श्री पराग कांबळे, राहणार-नालासोपारा, जिल्हा-पालघरः-</u>**

मी नालासोपारा येथे राहतो. आतापर्यंत उपस्थितांना खूपच चांगल्या प्रकारे मते मांडली. या जीवदानी देवी ट्रस्टने अत्यंत चांगल्या प्रकारे उपक्रम राबवविले आहेत. माझी कुलदेवता रेणुकादेवी जी कर्नाटकात आहे. पण मी जीवदानीला कुलदेवता मानतो व दरवर्षी दर्शनाला येतो. मागच्या वर्षी माझ्या वृध्द आई-वडिलांना मला जीवदानीचे दर्शन देता आले नाही. तरी मी विनंती करतो की हा प्रकल्प लवकरात लवकर संपूर्ण व्हावा, जेणेकरुन माझ्या वृध्द आई-वडिलांना मला दर्शनास आणता येईल. आमच्या नालासोपारा नागरिकांतर्फेही मी प्रकल्प पूर्ण करण्याची विनंती करतो.

१८) **<u>श्री गजेन्द्र कायेकर, राहणार-विरार, तालुका - वसई, जिल्हा-पालघरः-</u>**

मी म.प्र.नि. मंडळास विनंती करतो की हा प्रकल्प त्वरित मंजूर करण्यात यावा. कोविडच्या काळामध्ये या जीवदानी देवी ट्रस्टने एवढी मदत केली की त्याला तोड नाही. प्रत्येक गरीब व गरजू माणसाला तयार अन्न दिले, औषधे पुरविली आहेत. या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल. तरी शासनाने या प्रकल्पास लवकरात लवकर मान्यता द्यावी.

१९) **<u>श्री अमोल चौधरी, राहणार-विरार, तालुका - वसई, जिल्हा-पालघरः-</u>**

मी बिहारचा आहे. मी गेले १९ वर्षे येथे राहत असून जीवदानी मातेचा भक्त झालेलो आहे. लॉकडाऊन काळात ५० - ६० हजार लोकांना तयार अन्न या जीवदानी माता ट्रस्टने पुरविलेले आहे. त्याचप्रमाणे ट्रस्टतर्फे डॉक्टर, रुग्णवाहिका पुरविल्या जातात. गरजू विद्यार्थ्यांना पुस्तके पुरविली जातात. तरी ज्यांचा विरोध असेल त्यांना या गोष्टी मान्य करुन पाठिंबा द्यावा. प्रकल्पास आमचे समर्थन आहे.

पर्यावरण सल्लागार यांना धन्यवाद दिले.

२०) **श्री. एल. एन. गोसावी, राहणार-नालासोपारा, जिल्हा-पालघरः-**

माझ्या असे लक्षात आले की फ्युनिक्युलर सिस्टिम ९०% पूर्ण झालेला असून १०% बाकी आहे. या जीवदानी ट्रस्टतर्फे सामाजिक उपक्रम विविध गावा-गावात जाऊन राबविले जातात. मोफत औषधे ही गावा-गावत जाऊन दिली जातात. मी खानदेशी आहे, १९७३ मध्ये येथे आलो व संपूर्ण आयुष्य हे वसई, विरार, नालासोपारा येथे घालविले आहे. मी माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक म्हणून काम केलेले आहे. तरी मी उपस्थितांना सांगू इच्छितो की जीवदानी देवीच्या आशिर्वादने सदरहू प्रकल्प पूर्ण होईल.

२१) **श्री बाळकृष्ण शेट्टी, रंगा जेष्ठ नागरिक संस्था, विरार, तालुका - वसई, जिल्हा-पालघरः-**

आम्ही जेष्ठ नागरिक असून ३६० सभासद आहेत. जेष्ठ नागरिकांना पाय-यावरुन चढणे शक्य नाही. त्यामुळे दर्शन घेता येत नाही. तरी सदरहू प्रकल्पास म.प्र.नि. मंडळाने त्वरित मान्यता द्यावी.

२२) **श्री प्रफुल्ल साने, राहणार-विरार, तालुका -वसई, जिल्हा-पालघरः-**

मी एक वर्षाचा असताना आई-वडिल विरारला आले. मी लहानपणा पासून मंदिर पहात आहे. पुर्वी अगदी लहान मंदिर होते. नंतर पाय-या बांधण्यात आल्या. नंतर रोपवे तयार झाला. गेल्या काही वर्षात येथील लोकसंख्या वाढली व भाविकांच्या संख्येतही प्रचंड वाढ झाली. काळाची गरज ओळखून जीवदानी देवी ट्रस्टींनी चांगल्या सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. पाण्याची सोयही चांगली केलेली आहे.

ट्रस्टच्या माध्यमातून प्रचंड सामाजिक कार्य केले जाते, ग्रामीण

भागात जाऊन वैदकीय सुविधा पुरविण्यात येतात व तीर्थक्षेत्र म्हणूनच विकसित करण्यात आलेले आहे. शाळा सुरु केल्याने येथील शाळेत ३,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मुंबई शहर व ठाणे जवळ

असल्याने पर्यटन क्षेत्र म्हणूनही विकसित होणे गरजेचे आहे. त्यासाठी फ्युनिक्युलर सिस्टम (रोपवे) प्रकल्पाची गरज आहे. कोरोना काळात ट्रस्टने केलेली मदत सर्वांनीच सांगितली आहे.

तरी सर्व ट्रस्टींचे आभार व म.प्र.नि. मंडळास विनंती आहे की त्यांना सदरहू प्रकल्पास मान्यता द्यावी.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी पाठिंबा दिल्याबद्दल धन्यवाद दिले.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी येथे सांगितले की उपस्थित असलेल्या सर्वांनीच प्रकल्पास पाठिंबा दर्शविलेला असून एक तांत्रिक बाबींबाबत एक हरकत मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे.

पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी काही आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता. त्यावेळी समन्वयक यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याची इतिवृत्तांत नोंद घेण्यात येणार आहे.

प्राप्त झालेल्या लेखी सूचना, अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व इतिवृत्त पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली येथील तज्ञ समितीस सादर करण्यात येईल. तज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्थानिकांनी बैठकीत उपस्थित राहून सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे, प्रकल्प अधिकारी व शासकीय अधिकारी यांचे आभार मानले व अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी संपूर्ण झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी बैठक स्थगित करण्यात आली.

बैठकीत एकूण २७ सूचना प्राप्त झाल्या.

सदरहू प्रकल्पास पाठिंबा असलेली २६ पत्रे/सूचना व प्रकल्पास पाठिंबा पण काही मुद्द्यावर हरकत असलेले ०१ पत्रे सोबत जोडलेलले आहेत.

**(ईश्वर ठाकरे)**
समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, ठाणे-२

**(डॉ. राजेन्द्र राजपुत)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, ठाणे

**(डॉ. किरण महाजन),**
**अध्यक्ष**
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पालघर
जिल्हा- पालघर